महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

विषय :- फेब्रुवारी – मार्च २०२५ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेतील खेळाडू विद्यार्थ्यांच्या प्रस्तावांबाबत.

प्रकटन

फेब्रुवारी–मार्च २०२५ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेसाठी क्रीडा गुण सवलतीचे प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडून आपले सरकार प्रणालीव्दारे ऑनलाईन पध्दतीने दि.१५/०४/२०२५ पर्यंत स्विकारण्याबाबत सर्व विभागीय मंडळांना कळविण्यात आलेले होते.

तथापि दि.१० एप्रिल ते दि.१४ एप्रिल २०२५ या कालावधीत 'आपले सरकार' सेवा पोर्टल नियमित देखभालीसाठी बंद राहणार असल्याने सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाकडून खेळाडू विद्यार्थ्यांचे क्रीडा गुण सवलतीचे प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने संबंधित विभागीय मंडळाकडे सादर करण्यासाठी दि.२१/०४/२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

तरी याबाबत सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी, उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये मुख्याध्यापक/प्राचार्य व सर्व संबंधित घटकांनी उपरोक्त बाबींची नोंद घ्यावी.

(देविदास कुलाळ)
सचिव
राज्य मंडळ, पुणे –४.

पुणे – ४११००४.
दिनांक – ११/०४/२०२५.

जा.क.पुविमं/माध्यमिक क./ उमा अ,/2283
पुणे 411005
दिनांक 11/04/2025

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त शाळा/उच्च माध्य कनिष्ठ महाविद्यालय
जिल्हा पुणे, आहिल्यानगर व सोलापूर

उपरोक्त राज्यमंडळाच्या प्रकटनाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी सदर माहिती सर्व मान्यता प्राप्त शाळा/उच्च माध्य कनिष्ठ महाविद्यालयांनी आपल्या सूचना फलकावर लावून विदयार्थी व पालकांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

(औदुंबर सकिरडे)
विभागीय सचिव
पुणे विभागीय मंडळ, पुणे

प्रत माहितीस्तव
1 मा.सचिव राज्यमंडळ पुणे
2 शिक्षणाधिकारी माध्यमिक पुणे, आहिल्यानगर ,सोलापूर
3 जिल्हा: कीडाअधिकारी जिल्हा पुणे, आहिल्यानगर व,सोलापूर